# मुलांनाही लाभू देत मायदेशीचा वारा !

भारताबाहेरच्या सर्व मराठी मंडळींना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा! परक्या देशात नवलाख दिवे तळपत असले तरी मराठी माणसाच्या मनात 'ती माजघरातील मंद दिव्याची ज्योत' तेवतच असते. मायभूमिचा प्रसन्न वारा, चुलीवरच्या खमंग भाकरीची चव हे सगळं पुन्हा अनुभवावं असं वाटतं नि त्याची चव आपल्या मुलांना दाखवावी असंही वाटतं.

मग तुमचं नि तुमच्या मुलांचं स्वागत आहे ज्ञान प्रबोधिनीच्या हराळी येथील शिक्षण - शेती संकुलात! १९९३ च्या भूकंपानंतर ज्ञान प्रबोधिनीने धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातल्या हराळी या छोट्याशा गावी कामाला सुरुवात केली. प्रथम पुनर्वसन, वैद्यकीय सेवा व त्यानंतर शिक्षण आणि शेती. आता या गावी साठ एकरांवरती मधुर फळांच्या फळबागा आहेत. सात हजार फळझाडे इथे डोलताहेत. काजू, आंबा, लिंबू, आवळा, पेरू, चिंच अशी बहुविध फळझाडे आहेत. परिसरातील २०० गावांमधली ३०० शेतकऱ्यांची मुलं इथे राहून शिक्षण घेतात.

जुलै २०१२ मध्ये विदेशस्थ भारतीयांच्या मुलांसाठी एक प्रायोगिक स्वरूपाचं शिबीर हराळीला झालं. त्यात ओमानची तीन मुलं, कॅलिफोर्नियाची एक मुलगी आणि भारतातील अन्य प्रांतांमधली काही मुलं सहभागी झाली होती. एक आठवड्याच्या या शिबिरात काही मुलांचे पालकही सहभागी झाले होते. हराळीच्या बागांमध्ये हे मुक्त फिरले. मोर, हरणं, रानातले ससे, विविध प्रकारचे पक्षी त्यांनी मन भरून पाहिले. घोड्यांवर बसून स्वच्छंद रपेट केली. गोजिरवाण्या कोकरांना जवळ घेऊन कुरुवाळले. गाय-वासरांमधलं लडिवाळ प्रेम पाहिलं. काहींनी तर गाईचं दूध काढण्याचाही प्रयोग करून पाहिला. साहस शिक्षण ऐच्छिक होतं पण बहुतेकांना ते करायचंच होतं... म्हणजे दोन इमारतींना जोडणाऱ्या दोरावरून एका इमारतीच्या गच्चीतून दुसऱ्या इमारतीच्या गच्चीत उतरायचं. रॅपलिंग म्हणजे दोराच्या सहाय्याने इमारतीच्या भिंतीवरून खाली उतरायचं. श्रुती पेंडसे नावाच्या एका ताईने मुलामुलींना दोरावरचा मलखांब शिकवला. मस्कतच्या प्रियांका भट्टने मुलींची दोन सुंदर नृत्यं बसवली. दिल्लीच्या राधिकाने सर्वांना रांगोळीचे गालिचे शिकविले आणि कॅलिफोर्नियाच्या आश्लेषाने खूप प्रकारचे मोत्यांचे दागिने स्वतः तयार केले. प्रबोधिनीच्या निवासी शाळेतल्या मुलांशी या सर्वांची चांगली मैत्री झाली. या सगळ्यांची छायाचित्रे फेसबुक संकेतस्थळावर पाहायला मिळतील.

ज्ञान प्रबोधिनीचे दोन ज्येष्ठ अनुभवी शिक्षणतज्ञ या शिबिराचे मार्गदर्शक होते. एक म्हणजे डॉ. व. सी. तथा अण्णा ताम्हनकर आणि दुसऱ्या डॉ. लताताई भिशीकर यांनी मुलांशी मन-मोकळा संवाद केला. सुंदर सुंदर गोष्टी त्यांना सांगितल्या. मुलांचे विचार जाणून घेतले.

शिबिराचं संवाद माध्यम इंग्लिश होतं. रोज नवेनवे चवदार भारतीय पदार्थ मुलांना चाखायला मिळत. ते मुलांना आवडले. शिबिरात एक पूर्ण वेळ निवासी डॉक्टर होत्या. त्यांनी सर्वांच्या आरोग्याची काळजी घेतली. शुद्ध पाणी, शुद्ध हवा, आणि शुद्ध अन्न यामुळे फारसं कोणी आजारी पडलं नाही. डॉ. ललितताई नाडकर्णी आणि त्यांची कन्या शिल्पा यांनी योगासन-

प्राणायामाची सत्रं सुरेख घेतली. पुढच्या वर्षी आपण नक्की भेटायचं, शिबिराला यायचं असं ठरवूनच सर्वांनी परस्परांचा निरोप घेतला.

आता पुढचं शिबीर आहे **१५ ते २४ जुलै २०१३** या काळात. यावेळी कॅनडा, अमेरिका, युरोप आणि ओमान या ठिकाणाहून आपले छोटे मित्र-मैत्रिणी येणार आहेत. त्यांच्या पालकांचंही स्वागत आहे. त्यांचीही राहण्याची उत्तम व्यवस्था आहे. पालकांसाठी विशेष कार्यक्रमांचीही योजना आपण करत आहोत.

हराळी हे गाव हैदराबाद हायवेवरून थोडं आत, सोलापूरपासून ७४ कि.मी.वर आहे. मुंबईहून सोलापूरला येणाऱ्या सिद्धेश्वर एक्स्प्रेस आणि हुसेन सागर एक्स्प्रेस या दोन गाड्या आहेत. त्या रात्री मुंबईहून निघतात आणि सकाळी ६ ते ७ च्या दरम्यान सोलापूरला येतात. सोलापूर स्थानकापासून मुलांना आणि पालकांना हराळीला आणण्यासाठी वाहनांची व्यवस्था ज्ञान प्रबोधिनीतर्फे केली जाते. सोलापूरलाही प्रबोधिनीची शाळा आहे. तिथेही राहण्या-जेवण्याची व्यवस्था आहे.

हराळी आनंद शिबिराचं **शुल्क** (फी) **प्रतिव्यक्ती ५५० अमेरिकन डॉलर्स** आहे. शिबिराचा काळ **दहा** दिवसांचा आहे. यात गेल्या शिबिरातील सर्व आनंददायक कार्यक्रम तर असतीलच शिवाय भारतीय संगीत आणि नृत्य यांची आकर्षक ओळख तज्ज्ञ मंडळी करून देतील. अकलूज येथील शिवसृष्टीला (शिवाजी महाराजांच्या जीवनावरचं हलतं प्रदर्शन) भेट, वॉटरपार्कची गंमत आणि प्राचीन मंदिरांच्या शिल्पकलेचं दर्शन असेही कार्यक्रम योजले आहेत.

सर्व दृष्टीने पूर्ण सुरक्षित आणि निसर्गरम्य अशा या ठिकाणी एक वेगळाच, समृद्ध करणारा अनुभव घेण्यासाठी मुलांना पाठवा, शक्य असलं तर आपणही या!

शिबिराच्या नोंदणीसाठी खालील संपर्क आहेत.

धनादेश (चेक) **'Adopt a village Inc'** या नावाने पाठवावा.

**Vaman and Anuradha Ganu**
**Email:** Vaman.Ganu@coronapowersystems.com
**Phone:** 951-279-8870

**Sayali Mokate-Jog**
**Email:** sayali.mokate@gmail.com
**Phone:** 818-620-7119

**Sunanda Madan Tumne**
**Email:** s_tumne@yahoo.com
**Phone:** 905-828-2211

**फेसबुक संकेतस्थळ:** http://www.facebook.com/JnanaPrabodhiniHaraliSummerCamp

- डॉ. स्वर्णलता भिशीकर, ज्ञान प्रबोधिनी